




दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३०० वा | शुक्रवार दि १३ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# पार्थ पवारांच्या राज्यसभेचा मार्ग मोकळा, सुनेत्रा पवार-मोदी बैठकीत भाजपचा हिरवा कंदील...

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

दिग्गज नेते अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारलेल्या सुनेत्रा पवार यांनी बुधवारी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी , गृहमंत्री अमित शहा, राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन आदींची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांच्या जागी पार्थ पवार यांना लवकरच राज्यसभेवर पाठविण्याबाबत या दौऱ्यात भाजपने हिरवा कंदील दाखल्याचे समजते. या घडामोडींनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चेला स्वल्पविराम मिळाल्याचे पक्षसूत्रांनी स्पष्ट केले. दिल्लीत मंगळवारी रात्री दाखल झालेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या बुधवारी सकाळी दोन्ही सुपुत्र पार्थ आणि जय पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या रकाबगंज लेनमधील निवासस्थानी गेल्या. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हेही त्यावेळी उपस्थित होते. तेथून सकाळी ११ वाजता त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीसाठी गेल्या. सुमारे ४० मिनिटे झालेल्या चर्चेत पंतप्रधानांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त करतानाच राज्याच्या राजकारणातील अजितदादांच्या योगदानाचा उल्लेख केल्याचे व एनडीएतील घटक पक्ष म्हणून भाजप राष्ट्रवादी काँग्रेससोबत ठामपणे उभा राहील, अशी ग्वाही दिल्याचे सांगितले जाते उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दुपारी १२.१० च्या सुमारास राष्ट्रवादींच्या नेत्यांसह अमित शहा यांच्या संसदेतील दालनात गेल्या. तेथे सर्व नेत्यांमध्ये अर्धा तास बैठक झाली. त्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी दुपारी दीडच्या सुमारास राधाकृष्णन यांची भेट घेतली. सुनेत्रा पवार सध्या राज्यसभेचा राजीनामा देणार नसल्याची माहिती देतानाच, तांत्रिक नियमावलीनुसार त्यांनी राजीनामा दिल्यावर पार्थ यांना राज्यसभेत पाठविण्याबाबत शहा यांच्याकडून हिरवा



कंदील मिळाल्याचे पक्षनेत्यांनी सांगितले. या गाठीभेटींमध्ये दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाबाबत काही ठोस चर्चा झाली का? या प्रश्नाला पक्षनेत्यांनी थेट उत्तर दिले नाही. मात्र, हा मुद्दा आमच्यासमोर सध्या नसल्याचे त्यांनी नमूद केले. दुसरीकडे, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची आगामी महिनाभरात निवड करण्याचे ठरल्याचेही सूत्रांनी सांगितले.

# वडील शिक्षक, आई सहशिक्षिका, तरीही पोटच्या मुलाकडे दुर्लक्ष घरात कुणी नसताना लेकाचं टोकाचं पाऊल

**जनसंचलन/बुलढाणा**

आपली मुलं शाळेत जातात, नियमित खासगी कोचिंग क्लासेसला जातात. यापुढेही जाऊन नेमकं ते विचार तरी काय करतात? त्यांच्या मनात तरी काय चालू असतं? यावर आता लक्ष देण्याची वेळ आली आहे. कारण बुलढाणा शहरातील छत्रपती नगर परिसरात आठव्या वर्गात शिकणाऱ्या १३ वर्षीय विद्यार्थ्याने घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल बुधवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेनं शहरात व परिसरात हळहळ व्यक्त होत असून आत्महत्येचं कारण मात्र अद्याप अस्पष्ट आहे. मृत विद्यार्थी हा भारत विद्यालयात आठवीत शिक्षण घेत होता. त्याचे वडील हे वडोदा तांगडा येथे शिक्षक म्हणून शाळेच्या सहलीसाठी बाहेरगावी गेले होते. आई या धावडा येथील आश्रम शाळेत सहशिक्षिका आहेत. काल बुधवारी सकाळी आई शाळेसाठी निघाल्यानंतर मुलगा ट्युशनला गेला होता. सुमारे १० वाजता तो घरी परतला. मात्र, चाचणी परीक्षा असूनही तो शाळेत गेला नाही. वर्ग शिक्षकांनी अनुपस्थितीबाबत वडिलांना संपर्क साधल्यानंतर शेजाऱ्यांना घरी पाहणी करण्यास सांगण्यात आलं. त्याच्या घरी चौकशी केली असता मुलाचा मृतदेह अभ्यासाच्या खोलीत छताला लटकलेला अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला ज्या पद्धतीने या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला



आहे. आई-वडील दोन्हीही शिक्षक असताना आणि अत्यंत कोवळ्या वयात पोटच्या मुलाने उचललेलं टोकाचं पाऊल, यामुळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. यापूर्वी किंवा त्याच्या वर्गातल्या मित्रांकडून आता सर्व बाबी तपासून पोलीस या प्रकरणाची तपासणी करणार आहेत.

# मेटाची डेटाचोरी



डिजिटल जगतातील सर्वांना परस्परांची माहिती परभारे उपलब्ध करून देण्याच्या - म्हणजेच ङ्कडेटा शेअरिंगफ्च्या नावाखाली नागरिकांच्या गोपनीयतेच्या अधिकारांचे उल्लंघन करता येणार नाही, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने ङ्कव्हॉट्सअॅपफ आणि त्याची पालक कंपनी ङ्कमेटा प्लॅटफॉर्म्स इन्कॉर्पोरेशनफ्ला फटकारल्यामुळे कोट्यवधी वापरकर्त्यांच्या वैयक्तिक माहितीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागरिकांची माहिती किंवा ते साधत असलेल्या संवादापैकी एकाही शब्दाचा इतरत्र वापर होऊ देणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सुनावले आहे; इतकेच नव्हे तर ङ्कदेशातील कायदे पाळता येत नसतील, तर चालते व्हा,फ अशा शब्दांत या कंपन्यांना बजावल्याने या कंपन्यांना आपल्या खासगीपणाच्या धोरणात बदल करण्यावाचून सध्या तरी पर्याय दिसत नाही. येत्या सोमवारी या संदर्भातील खटल्यात देण्यात येणारा अंतरिम आदेश भविष्यासाठी दिशादर्शक ठरू शकतो. साधारण दीड दशकापूर्वी अमेरिकेत सुरू झालेल्या ङ्कव्हॉट्सअॅपफ्चा आजमितीला जगभरात तीन अब्जांहून अधिक नागरिक वापर करतात. भारतात ही संख्या ८५ कोटींच्या घरात आहे. या कंपनीला इतक्या मोठ्या प्रमाणात मोफत सेवा परवडते कशी आणि त्यांच्या उत्पन्नाचा स्रोत काय, या प्रश्नाचे उत्तर आहे ङ्कडेटा शेअरिंगफ्मध्ये. या व्यासपीठांवरील ङ्कडिजिटल फूटप्रिंटफ्मधून आकारास येणारे ग्राहकांच्या वर्तणुकीचे लसावि अर्थात ङ्कबिहेवियर पॅटर्नफ ही नव्या युगातली मौल्यवान संपत्ती आहे. याच ङ्कमेटाफ कंपनीच्या मालकीचे ङ्कफेसबुकफ आणि ङ्कइन्स्टाग्रामम हे अन्य लोकप्रिय प्लॅटफॉर्म आहेत. सध्या सुरू असलेल्या खटल्यातील न्यायमूर्तींनी ङ्कएखादा डॉक्टर तुम्हाला व्हॉट्सअॅपवर काही औषधे पाठवतो आणि पाच मिनिटांतच तुमच्यावर या अन्य व्यासपीठांवरूनही औषधांच्या जाहिरातींचा मारा सुरू होतो,फ असे या चलाखीचे नेमके उदाहरण दिले. ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीचे पृथ:करण-विश्लेषण करून त्यांच्या सवयी, आवडीनिवडी आणि खरेदीच्या प्रवाहांवर आधारित ङ्कप्रोफाइलफ केले जाते आणि या संभाव्य ग्राहकांवर होणाऱ्या ङ्कटार्गेटेडफ जाहिरातींच्या धबधब्यातून या कंपन्यांकडे पैशांचा ओघ सुरू होतो, असे हे गणित आहे. या धंदेवाइक दुष्टचक्रामध्ये पहिला बळी जातो नागरिकांच्या गोपनीयतेचा. २०१७मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने घटनेच्या १४, १९ आणि २१व्या कलमानुसार गोपनीयता, हा मूलभूत अधिकार असल्याच्या मुद्द्यावर शिक्कामोर्तब केले. माहिती अधिकार (आयटी) कायदा आणि ङ्कडिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शनफ कायद्यानुसार वापरकर्त्यांच्या सहमतीशिवाय त्याच्या माहितीचे ङ्कशेअरिंगफ किंवा व्यावसायिक वापरावर बंदी आहे. मात्र, ङ्कमेटाफ्ने पाच वर्षांपूर्वी लागू केलेले खासगीपणाचे धोरण त्याच्याशी फारकत घेणारे आहे. विशेषत: या क्षेत्रात अन्य फारसे पर्याय नसल्याने ङ्कघ्यायचे तर घ्या,फथाटाच्या मुजोरीला बाजारातील तुमच्या दबदब्याचा गैरवापर करू नका, अशा शब्दांत प्रथम स्पर्धा आयोग आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाने ङ्कव्हॉट्सअॅपफ आणि ङ्कमेटाफ्ला जोरदार चपराक लगावली आहे. माहितीचा इतरत्र वापर करण्याबाबत अस्वीकृती दर्शवण्याची पद्धतही सर्वसामान्य-गावखेड्यांतील वापरकर्त्यांसाठी अत्यंत तांत्रिक व किचकट असल्याचे मत न्यायालयाने नोंदवले आहे. सध्या अमेरिकेत सॅन फ्रान्सिस्कोमध्ये तर एंड टु एंड इन्क्रिप्टेडफ्चा दावा करणारे वैयक्तिक संवादही सुरक्षित नसल्याबाबत खटला सुरू आहे; ङ्कव्हॉट्सअॅपफ्ने हा दावा फेटाळला आहे.काही देशांत या माहितीचे व्यावसायिक मूल्य मान्य झाले असून डेटा शेअरिंगफ्वर करआकारणीही सुरू झाली आहे. मात्र, भारतातील या खटल्याने नागरिकांच्या गोपनीयतेचा अधिकार, त्यांच्या माहितीचा सर्रास होणारा व्यावसायिक वापर आणि तिच्या गैरवापरातून पिळवणूक होण्याची भीती अशा अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. या दोन्ही कंपन्यांच्या अफाट लोकप्रियतेबरोबरच येणारी मक्तेदारी, हा सर्वांत चिंतेचा विषय. विमानसेवा, विमानतळ किंवा टेलिकॉम- ई कॉमर्स अशा अनेक क्षेत्रांमध्ये या मक्तेदारीचे वळण ग्राहकांच्या शोषणापर्यंत जाऊन ठेपण्याची भीती निर्माण झाली आहे. तिला चाप लावण्यासाठी विशेषत: ग्राहकांच्या जिव्हाळ्याच्या क्षेत्रांमध्ये अधिकाधिक स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हायला हवे. हे गैरप्रकार रोखण्यासाठी पुरेसे कायदे आणि जनजागृती झाली नाही, तर पुन्हा ङ्कडिजिटल गुलामगिरीफ्च्या दिशेने प्रवास सुरू होऊ शकतो, हे लक्षात ठेवले पाहिजे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुनेत्रा पवार यांना जबरदस्ती उपमुख्यमंत्री केलं का? सुनील तटकरे म्हणाले..

**नवी दिल्ली :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधननंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज पहिल्यांदा दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीनंतर खासदार सुनील तटकरे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी सुनील तटकरे यांनी अनेक प्रश्नांवर प्रतिक्रिया दिली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या अपघाताच्या घटनेवर पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी काही दावे केले. सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री होण्यासाठी इच्छुक नव्हत्या असा थेट उल्लेख आमदार रोहित पवार यांनी केल्याचं पत्रकारांनी सुनील तटकरे यांना सांगितलं. त्यावर सुनील तटकरे यांनी भूमिका मांडली.जो निर्णय झाला तो सहमतीने झाला. पक्षामध्ये सहमतीने झाला. आता त्याबद्दल भाष्य करण्याचा इतरांना काय अधिकार? कारण हा राजकीय निर्णय



आहे. राजकीय निर्णय घेण्याचा राजकीय पक्षाला अधिकार आहे.आमचा राजकीय पक्ष हा भारतीय निवडणूक आयोगाने, सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार यांच्या नेतृत्वाला मान्यताप्राप्त आहे, असा निर्णय दिला आहे. त्यामुळे आमच्या पक्षाचा निर्णय घेण्याचा सर्व अधिकार आमचा आहे', अशी प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी दिली.सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला का? असा प्रश्न सुनील तटकरे यांना यावेळी विचारण्यात आला.

त्यावर त्यांनी भूमिका मांडली. राजीनामा दिलेला नाही, कारण उपराष्ट्रपती हेच राज्यसभेचे सभापती असल्यामुळे त्यांची भेट घेणं हा आजच्या भेटीमागचं कारण होतं', असं तटकरे यांनी स्पष्ट केलं.सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी घेतल्यानंतर राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा का दिला नाही? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर 'कुठल्याही व्यक्तीला राज्याचे किंवा देशाचे मंत्री होत असताना सहा महिने त्या सभागृहाचा सदस्य होण्याचा अवधी असतो. अशावेळेला दुसऱ्या सभागृहाचं सदस्यत्व त्यांच्याकडे असेल तर तेही कायद्यान्वे ठेवता येतं. अजित पवार १९९१ खासदार झाले. त्यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार हे केंद्रीय संरक्षण मंत्री झाले. त्यावेळी अजित पवार राज्यात सुधाकर नाईक यांच्या मंत्रिमंडळात जावून राज्यमंत्री झाले. मी अजित पवार यांचं उदाहरण का दिलं? कारण आज त्या परिवाराशी निगडीत असलेल्या प्रश्न आहे म्हणून त्यांचं उदाहरण दिलं', असं सुनील तटकरे यांनी सांगितलं.अजित पवार यांच्या अपघातावर रोहित पवार यांनी शंका उपस्थित केली. त्याबाबत सुनील तटकरे यांना प्रश्न विचारण्यात आला. 'अजित पवार यांच्या अपघाताची सखोल चौकशी भारत सरकारने आणि राज्य सरकारने करावी ही भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पहिल्या दिवसापासूनची आहे. युरोपीयन कंपनीकडे तपास दिला होता का? कुणी फोन केला? ते मला माहिती नाही. त्यांनी कुणाचा फोन गेला, काय गेला, तपास यंत्रणांमध्ये कोण नेमत असतं त्याची माहिती ते जाणकर असल्याने त्यांच्याकडे अधिक माहिती असेल', असा टोला तटकरे यांनी लगावला.

'रोहित पवार यांनी माझं नाव कुठे घेतलं ते सांगा. तर मला उत्तर देता येईल. माझी नियोजित वेळ ही २७ जानेवारीची संध्याकाळी ५ वाजेची होती. ती भेट पावणे सात वाजता संपली. ती भेट तीन दिवस आधी ठरली होती. कारण दोन दिवस अजित पवार पुण्याच्या दौऱ्यावर होते, मी रायगडच्या दौऱ्यावर होतो', असंदेखील सुनील तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

## पार्थ पवारांच्या राज्यसभेचा मार्ग मोकळा

**नवी दिल्ली :** दिग्गज नेते अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारलेल्या सुनेत्रा पवार यांनी बुधवारी दिल्लीत नरेंद्र मोदी, अमित शहा, सी. पी. राधाकृष्णन आदींची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांच्या जागी पार्थ पवार यांना लवकरच राज्यसभेवर पाठविण्याबाबत या दौऱ्यात भाजपने हिरवा कंदील दाखवल्याचे समजते. या घडामोडींनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चेला स्वल्पविराम मिळाल्याचे पक्षसूत्रांनी स्पष्ट केले. दिल्लीत मंगळवारी रात्री दाखल झालेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या बुधवारी सकाळी दोन्ही सुपुत्र पार्थ आणि जय पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या रकाबगंज लेनमधील निवासस्थानी गेल्या. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हेही त्यावेळी उपस्थित होते. तेथून सकाळी ११ वाजता त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीसाठी गेल्या. सुमारे ४० मिनिटे झालेल्या चर्चेत पंतप्रधानांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त करतानाच राज्याच्या राजकारणातील अजितदादांच्या योगदानाचा उल्लेख केल्याचे व एनडीएतील घटक पक्ष म्हणून भाजप राष्ट्रवादी काँग्रेससोबत ठामपणे उभा राहील, अशी ग्वाही दिल्याचे सांगितले जाते.उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दुपारी १२.१० च्या सुमारास राष्ट्रवादींच्या नेत्यांसह अमित शहा यांच्या संसदेतील दालनात गेल्या. तेथे सर्व नेत्यांमध्ये अर्धा तास बैठक झाली. त्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी दुपारी दीडच्या सुमारास राधाकृष्णन यांची भेट घेतली.सुनेत्रा पवार सध्या राज्यसभेचा राजीनामा देणार नसल्याची माहिती देतानाच, तांत्रिक नियमावलीनुसार त्यांनी राजीनामा दिल्यावर पार्थ यांना राज्यसभेत पाठविण्याबाबत शहा यांच्याकडून हिरवा कंदील मिळाल्याचे पक्षनेत्यांनी सांगितले.

## राज ठाकरे मोदींना जास्तच घाबरलेत!
## माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारींची टीका

**नाशिक :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या कार्यक्रमावर टीका करणाऱ्या मनसेप्रमुख राज ठाकरे यांना माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी डिवचले आहे. 'मी राज ठाकरे यांचा खूप सन्मान करतो. मात्र मला वाटतं, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जास्तच घाबरलेत. मोदींना घाबरू नका, त्यांच्या जवळ जा. जसे प्रभू श्रीरामाला सर्व समान होते, तसेच नरेंद्र मोदींनादेखील सर्व समान आहेत', असे कोश्यारी म्हणाले.माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी एका खासगी कार्यक्रमासाठी बुधवारी नाशिक दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना राज ठाकरे आणि मोहन भागवत यांच्यातील वादावर भाष्य केले. 'नेहरू सेंटर येथे सरसंघचालकांच्या यांच्या व्याख्यानास गेलेले लोक पंतप्रधान मोदी यांच्या सरकारी भीतीमुळे गेले होते,' अशी टीका राज ठाकरे यांनी केली होती. 'आजवर का कुणी या असल्या रटाळ प्रवचनाला आले नाहीत,' असा सवालही त्यांनी केला होता. राज ठाकरे यांनी भाषिक मुद्द्यावरूनही सरसंघचालकांवर टीकास्त्र सोडले होते. त्याला कोश्यारी यांनी उत्तर दिले. 'जी लोक कार्यक्रमाला आली ती सर्व लोक पंतप्रधान नरेंद्र मोदींना घाबरली नसतील. पण राज ठाकरे हे नरेंद्र मोदींना जास्तच घाबरले आहेत,'



असे ते म्हणाले.'४० वर्षांपूर्वी देखील मी नाशिकमध्ये आलो होतो. त्र्यंबकेश्वर आणि पंचवटी येथे आलो होतो. मोठ्या प्रमाणात भाविक येथे दर्शनासाठी येतात. मीदेखील आज एक भक्त म्हणून आलो आहे. राज्यपाल असतानाही मी नाशिकमध्ये आलो होतो,' अशा आठवणी कोश्यारी यांनी जगावल्या. 'जसा अयोध्येत कॉरिडॉर झाला, तसा इथेदेखील झाला पाहिजे,' अशी मोठी मागणीही त्यांनी केली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघात नाही, तर शंभर टक्के घातपात असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केला होता.

## सावदा पोलीस ठाण्यात खडसे आणि पोलीस अधिकाऱ्यात वाद?
## शिवीगाळ केल्याचा आरोप, एकनाथ खडसेंवर गुन्हा दाखल

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा विधान परिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांच्यावर सावदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावदा पोलीस ठाण्यात पोलीस अधिकाऱ्यांना अश्लील भाषेचा वापर करुन अवमान केल्याप्रकरणी आणि शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकनाथ खडसे यांनी एका बड्या मंत्र्यांबाबतही पोलीस ठाण्यात अर्वाच्य भाषा वापरल्याचा आरोप देखील असल्याची मिळत आहे. या घटनेची गंभीर दखल घेत पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सावदा पोलीस ठाण्यामध्ये एका गौण खनिज चोरीच्या प्रकरणात पोलिसांना



जाब विचारताना एकनाथ खडसेंनी अर्वाच्य शब्दात अरेरावी केल्याचा आरोप आहे. एकनाथ खडसे हे बुधवारी सावदा पोलीस ठाण्यात गेले होते. तिथे त्यांनी पोलिसांना रावेरच्या तासखेडा येथील गौणखाणीचा गुन्हा का दाखल केला नाही? असा जाब विचारत पोलीस निरीक्षकास तुम्ही ✻ खाता का? अशा अपमानास्पद शब्दात जाब विचारल्याचा आरोप आहे. यावेळी शाब्दिक वाद झाल्यानंतर खडसेंनी अर्वाच्य भाषा वापरल्याचा आरोप आहे. तसेच तुमच्यावर अँटी करप्शनचा ट्रॅप लावतो, असा इशारा एकनाथ खडसे यांनी दिल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर एकनाथ खडसे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मुक्ताईनगरचे उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे या गुन्ह्याचा तपास वर्ग करण्यात आल्याची माहिती आहे.या घटनेवर एकनाथ खडसे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. शासनाच्या मुरुमाची मोठ्या प्रमाणात चोरी होते. 'त्याबद्दल मी त्यांना अडीच महिने कशी चौकशी होते? असा प्रश्न विचारला. त्यावर ते म्हणाले, मला वाटेल तोपर्यंत मी चौकशी करेन. मला काय तुमचं बंधन आहे का? म्हणे त्या डिपार्टमेंटवाल्यांनी पैसे खाल्ले. मग मी म्हटलं, त्यांनी पैसे खाल्ले मग तू काय ✻ खाल्ला? तुला काम दिलं आहे ना? मग नंतर मी लगेच दोन मिनिटात सांगितलं की, माझा चुकीचा शब्द गेला. मी तुझी माफी मागतो. आता शेवटचा शब्द आहे, तुम्ही जे हफ्ते घेतात त्या प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे जावं लागेल आणि नवी कारवाई करावी लागेल', अशी भूमिका एकनाथ खडसे यांनी या घटनेवर दिली आहे.चाळीस ते पन्नास हजार ब्रास गौण खनिज चोरीला गेली असल्याची एका व्यक्तीने तक्रार दिलेली आहे. डिसेंबर महिन्यामध्ये मी गौण खनिजाचा प्रश्न अधिवेशनामध्ये उपस्थित केला होता. तक्रार केल्यामुळे तेथील जो पोलीस अधिकारी आहे त्याची जीवावर आली. माझ्याने अपशब्द वापरला गेला. त्याबद्दल मी त्याची माफी देखील मागितली आहे. हप्ते घेतात म्हणून अँटीकरप्शनकडे जावं लागेल आणि कारवाई करावी लागेल असं त्या ठिकाणी मी बोललो. सावदा परिसरातील नागरिकांना आवाहन करतो की कुठे दोन नंबरचे धंदे सुरू आहे त्याचे फोटो मला पाठवा आणि मी रोज मीडियासमोर ते दाखवेन', असंदेखील एकनाथ खडसे म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महात्मा गांधींवरील निबंधाची दखल, मुलीवर अत्याचार करणाऱ्या दोषी तरुणाची शिक्षा घटवली

**मुंबई :** अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेप सुनावलेल्या आरोपीची शिक्षा कमी करण्यात आली आहे. आरोपीचे तरुण वय, दीर्घकालीन तुरुंगवास आणि जेलमधील सुधारणात्मक प्रयत्नांची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने ही शिक्षा बारा वर्षांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे महात्मा गांधींवरील निबंध उपक्रमातील सहभागाचाही यात समावेश आहे.न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि संदेश पाटील यांच्या खंडपीठाने २ फेब्रुवारी रोजी दिलेल्या आदेशाची प्रत मंगळवारी उपलब्ध झाली. त्यानुसार २०१६ मध्ये घडलेल्या गुन्ह्यातील आरोपीची शिक्षा कायम ठेवण्यात आली आहे, परंतु त्याला ठोठावण्यात आलेली जन्मठेपेची शिक्षा कमी करण्यास पात्र असल्याचे नमूद केले.विशेष पोक्सो न्यायालयाने दिलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेला दोषी तरुणाने आव्हान दिले होते. या याचिकेवर खंडपीठाने हा आदेश दिला. गुन्ह्याच्या वेळी दोषी केवळ २० वर्षांचा होता. त्याला कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी



नाही. तो डिसेंबर २०१६ पासून कोठडीत होता. कोविड-१९ काळातही त्याची सुटका झाली नव्हती, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले.तुरुंगातील शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवणाऱ्या दोषी तरुणाच्या प्रशस्तिपत्रकांचाही कोर्टाने विचार केला. यामध्ये म हात्मा गांधींच्या विचारांचा अभ्यास करणारा उपक्रम आणि निबंध स्पर्धेचाही समावेश आहे.गुन्ह्याच्या गांभीर्याच्या पार्श्वभूमीवर या सुधारणात्मक घटकांचा विचार करत खंडपीठाने म्हटले की, 'आमच्या मते १२ वर्षांची शिक्षा न्यायाच्या उद्दिष्टांना पूर्ण करेल. दोषी तरुणाने आधीच तुरुंगात घालवलेला कालावधी पाहता शिक्षा कमी झाल्याने तो वसूल होईल, असेही कोर्टाने म्हटले आहे.मुंबईत ९ डिसेंबर २०१६ रोजी त्यावेळी पाच वर्षांची असलेली चिमुरडी शेजाऱ्यांच्या घरी पाणी आणण्यासाठी गेली होती. त्यावेळी तिथे तरुणाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घाबरलेल्या मुलीने तात्काळ आपल्या कुटुंबाला हा प्रकार सांगितला. त्यांनी तरुणाला जाब विचारला आणि पोलिसात तक्रार दाखल केली. कोर्टात खटला सुरु असताना आठ वर्षांच्या झालेल्या पीडितेने आरोपीला ओळखलं होतं.अल्पवयीन मुलीची साक्ष विश्वसनीय आणि सुसंगत असल्याचे हायकोर्टाने लक्षात घेतले होते. तिने घटना स्पष्टपणे सांगितली होती, तिला पढवल्याचे वाटत नव्हते.

## मुंबईत भर दिवसा गोळीबाराचा थरार, १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू; राजधानी हादरली

**मुंबई :** महाराष्ट्राची राजधानी आज गोळीबाराच्या घटनेने हादरली आहे. मुंबईत गोवंडी येथे शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत भर दिवसा गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेत एका १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर हल्ला करणारी व्यक्ती पळून गेली आहे. तर दुसरीकडे घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी या घटनेचा तातडीने तपास सुरु केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेतल्याची देखील माहिती समोर येत आहे. मुंबई सारख्या मोठ्या शहरात अशा प्रकारची गोळीबाराची घटना घडल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. पण मुंबईत गोळीबाराच्या घटना सातत्याने समोर येत आहे.नुकतंच काही दिवसांपूर्वी बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या घराबाहेर गोळीबार झाला होता.



अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबाराची घटना याआधी घडली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांचीदेखील गोळीबार करून हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली होती. पण आज शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत झालेली घटना ही वेगळी असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास तरुणीवर गोळीबार करण्यात आला. पूर्ववैमनस्यातून ही गोळीबाराची घटना घडल्याची माहिती प्राथमिक तपासातून समोर येत आहे. वैयक्तिक वादातून ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस या घटनेचा सविस्तर तपास करत आहेत. या घटनेची सध्या परिसरातील नागरिकांमध्ये चांगलीच चर्चा सुरु आहे.मृतक तरुणीवर त्याच परिसरात राहणाऱ्या एका महिलेने गोळी झाडून ठार केल्याची माहिती आहे.

## विहिरीत तरुणाची बॉडी आढळली

**छत्रपती संभाजीनगर :** रक्ताच्या नात्याला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना लासूर स्टेशन परिसरात उघडकीस आली आहे. मुलाच्या सततच्या त्रासाला कंटाळून एका आईनेच त्याच्या हत्येचा कट रचला आणि ३० हजार रुपयांची सुपारी देऊन त्याचा काटा काढला. शहानवाजपूर येथील एका विहिरीत आढळलेल्या त्या बेवारस मृतदेहाचे गूढ शिल्लेगाव पोलिसांनी अत्यंत चाणाक्षपणे उकललं आहे. जावई कमलसिंग सिंगल, राहणार टाकळीवाडी, जावयाचा मित्र गोरख शेकू अहिरे, राहणार एकभुर्जी वाघलगाव अशी आरोपींची नावे आहेत. या दोघांना पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,२६ जानेवारी रोजी शहानवाजपूर शिवारातील एका विहिरीत अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयोगटातील पुरुषाचा मृतदेह तरंगताना आढळला होता. विशेष म्हणजे, हा मृतदेह दोरीने बांधून पांढऱ्या पन्नीमध्ये गुंडाळलेला होता आणि तो पाण्याखाली राहावा यासाठी त्यात दगड भरले होते. यावरून हा घातपात असल्याचे स्पष्ट झाले होते.

## विवाहित पूजाचा धक्कादायक मृत्यू; पतीच्या अनैतिक संबंधांचा संशय आल्यानंतर काय घडलं?

**नाशिक :** नाशिकच्या कळवण येथे एका विवाहितेचा संशयास्पद मृतदेह आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पूजा सुरज छजलानी असं ३१ वर्षीय मृत विवाहित महिलेचं नाव आहे. याप्रकरणी पूजाच्या भावाने दिलेल्या फिर्यादीच्या आधारे पोलिसांकडून पतीसह सासरच्या तीन आणि संशयित पतीच्या प्रेयसीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, कळवण येथील उपजिल्हा रुग्णालय वसाहतीमध्ये पूजा छजलानी (वय ३१) या पती सुरज छजलानी आणि सासरकडच्या लोकांसोबत राहत होत्या. याच ठिकाणी ३० नोव्हेंबर २०२५ रोजी त्या जळालेल्या अवस्थेमध्ये आढळून आल्या होत्या. त्यानंतर पूजा यांच्यावर मागील जवळपास अडीच महिन्यांपासून उपचार सुरू होते. मात्र नुकताच उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे आहे. मयत पूजा हिच्या माहेरच्या



नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पती, सासू, नणंद आणि पती सुरज याच्या कथित प्रेयसीविरोधात कळवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पूजा छजलानी हिचा विवाह दिनांक २५ नोव्हेंबर २०१३ साली सुरज छजलानी याच्यासोबत झाला होता. लग्नानंतर घरातील काम आणि मानपानाच्या कारणाहून वेळोवेळी पूजा हिला म नसिक आणि शारीरिक त्रास दिला जात असल्याचा आरोप तिच्या माहेरच्या लोकांकडून करण्यात आला आहे. तसंच पूजा हिला पती सूरज याच्या अनैतिक प्रेमसंबंधांबाबत संशय आल्यानंतर तिने त्याला जाब विचारला होता. मात्र हा जाब विचारला असता, तिला जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचं देखील पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे.दि.३० नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास पूजा ही जळालेल्या अवस्थेत आढळून आली होती.

# नवी मुंबईतील हवालदाराने साताऱ्यात तरुणाला संपवलं

**सातारा :** खंडाळा तालुक्यातील सुखेड गावच्या हद्दीतील विहिरीत अर्धवट जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. सातारा स्थानिक गुन्हे शाखा आणि लोणंद पोलिसांनी ७२ तासात या प्रकरणाचे गूढ उकलत चौघांना बेड्या ठोकल्या आहेत. मैत्रिणीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून तरूणाची हत्या केल्याची कबुली संशयितांनी दिली आहे. खंडाळा तालुक्यातील सुखेड गावातील एका विहिरीत २५ ते ३० वर्षे वयाच्या अनोळखी तरूणाचा अर्धवट जळालेला मृतदेह हातपाय बांधलेल्या अवस्थेत आढळून आला होता. पोलिसांच्या प्राथमिक तपासात मृताचे सोमनाथ कल्याण बोबडे (रा. सेक्टर २०, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड) असल्याचे निष्पन्न झाले. घातपाताची घटना असल्याने



लोणंद पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. फलटणचे डीवायएसपी विशाल खांबे, सातारा एलसीबीचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर, लोणंदचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे यांच्या पथकाने सलग तपास करत हा गुन्हा उघडकीस आणला.सातारा स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे एका संशयित कारचा शोध लावला. सलग तीन दिवसांच्या अहोरात्र तपासा संशयितांनी तरुणाची कळंबोली येथे नियोजनपूर्वक कट रचून हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी बंडू बापू भिसे (रा. कळंबोली, ता. पनवेल, मूळ रा. दुधेबावी, ता. फलटण), विजय पोपटराव पवार (रा. साखरवाडी, ता. फलटण), किरण विकास गायकवाड (मूळ रा. होळ, ता. फलटण, हल्ली रा. पारी चौक, पुणे) आणि श्रीनिवास ज्ञानेश्वर लोणे (रा. चुरमापुरी, ता. अंबड, जि. जालना, हल्ली रा. रायकर मळा, धायरी, पुणे) या चौघांना पोलिसांनी अटक केली आहे.संशयित आरोपींनी सोमनाथ बोबडे याला कळंबोली येथे जबरदस्तीने होंडा सिटी कारमध्ये (चक -१२ उद्य ८८४६) बसवून दोरीने हातपाय बांधले. गाडीतच त्याचा गळा आवळून खून केल्यानंतर मृतदेह सुखेड येथे आणून पेट्रोल टाकून पेटवला. अर्धवट जळालेला तो मृतदेह विहिरीत टाकला. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी विहिरीत मृतदेह आढळून आला होता. त्यानंतर ७२ तासात हत्येचा छडा लावून चौघांना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आलं.मुख्य आरोपी बंडू बापू भिसे (वय ४९) हा नवी मुंबईतील रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात हवालदार पदावर कार्यरत आहे. तो मूळचा फलटण तालुक्यातील दुधेबावी गावचा आहे. भिसे याचे एका महिलेशी अनैतिक संबंध होते. मृत सोमनाथ बोबडे याचेसुद्धा त्या महिलेशी संबंध जुळल्याने दोघांमध्ये तणाव निर्माण झाला होता. भिसे याचे काही फोटो व व्हिडिओ बोबडेच्या हाती लागल्याने तो भिसेला ब्लॅकमेल करत होता.

# केंद्रीय करार जाहीर, 'अ+' श्रेणी रद्द

## कोहली, रोहित यांना गट 'ब'मध्ये स्थान, अक्षर पटेल 'क' मध्ये शमीसह अन्य तिघांना वगळले






### जेमिमा रॉड्रिग्सला 'अ' गटात बढती

■ कर्णधार हरमनप्रीत कौर, दीप्ती शर्मा आणि स्मृती मानधना यांनी महिलांच्या यादीत आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे, तर भारताची विश्वचषक स्टार जेमिमा रॉड्रिग्जला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यातील उत्कृष्टकामगिरीसाठी गट 'ब'मधून 'अ'मध्ये बढती मिळाली आहे. स्नेह राणालाही पदोन्नती मिळाली आहे आणि ती आता शेफाली वर्मा, रिचा घोष आणि रेणुका सिंह ठाकूर यांच्यासह गट 'ब'मध्ये पोहोचली आहे. गट 'क'मध्ये १३ क्रिकेटपटू आहेत. सध्याच्या घडीला महिलांच्या केंद्रीय करारातील रिटेनरशिप फी अनुक्रमे ५० लाख, ३० लाख आणि १० लाख आहे.

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बीसीसीआयने दिलेल्या ताज्या वार्षिक केंद्रीय करारात वरिष्ठ सुपरस्टार विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना गट 'ब'मध्ये स्थान देण्यात आले असून मंडळाने ७ कोटी रुपयांची रिटेनरशिप फी असलेली सध्याची 'ए+' श्रेणी रद्द केली आहे. बीसीसीआयने ३० पुरुष आणि २१ महिला क्रिकेटपटूंना गट 'अ', 'ब' आणि 'क'मध्ये वर्गीकृत केंद्रीय करार दिला आहे.

नवीन केंद्रीय कराराचा कालावधी कामगिरी आणि मागील हंगामात खेळलेल्या सामन्यांच्या संख्येवर आधारित आहे. दोन स्वरूपातील कर्णधार शुभमन गिल, वरिष्ठ वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि प्रमुख कसोटी अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा यांना गट 'अ'मध्ये कायम ठेवण्यात आले. तथापि, बीसीसीआयने तिन्ही श्रेणींसाठी रिटेनरशिप फी किती असेल याचा उल्लेख केला नाही. 'अ+' श्रेणी रद्द झालेली असून मागील हंगामात गट 'अ'चे मूल्य ५ कोटी ऊपये, गट 'ब'चे वार्षिक मूल्य ३ कोटी ऊपये आणि गट 'क'चे मूल्य १ कोटी ऊपये होते. कोहली आणि रोहित यांच्या बाबतीत, कसोटी आणि टी-२० मधून निवृत्ती घेतल्याने ते एका स्वरुपाचे खेळाडू बनतात आणि म्हणूनच निकषांनुसार त्यांना सर्वोच्च श्रेणीत कायम ठेवता आले नसते. मिळालेल्या माहितीनुसार, 'अ+' ही श्रेणी माजी प्रशासक समितीने माजी भारतीय कर्णधार महेंद्रसिंग धोनीच्या सूचनेवरून सुरू केली होती. ती तिन्ही स्वरूपातील उत्कृष्टतेसाठी होती आणि इतक्या वर्षात फक्त चार जण म्हणजे कोहली, रोहित, जडेजा आणि बुमराह त्या श्रेणीसाठी पात्र ठरलेले आहेत. परंतु चारपैकी तीन जण एक किंवा दोन स्वरुपातून निवृत्त झाल्यामुळे बीसीसीआयला फक्त बुमराहला सदर श्रेणीमध्ये ठेवायचे नव्हते. गेल्या हंगामात ३४ खेळाडूंना करार देण्यात आले होते, परंतु यावेळी यादी कमी करून ३० करण्यात आली आहे. अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी, यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन, वेगवान गोलंदाज मुकेश कुमार आणि मुंबईचा फलंदाज सर्फराज खान यांचा यादीत समावेश नाही. शमीला वगळण्यात आल्याने तो आता निवड समितीच्या यादीत नसल्याचे दिसून येते. ३० नावांपैकी फक्त तिघांना 'अ' श्रेणी मिळाली आहे. ११ जणांना 'ब' श्रेणीत आणि १६ जणांना 'क' श्रेणीत स्थान मिळाले आहे. आश्चर्य म्हणजे वरिष्ठ खेळाडू अक्षर पटेलला एका स्वरुपात खेळणाऱ्या खेळाडूंसह गट 'क'मध्ये खाली टाकण्यात आले आहे.

# नेमबाज संभाजी पाटील दुर्घटनेत ठार





**मुंबई/वृत्तसंस्था :** २७ वर्षीय भारताचा आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी पाटीलचे मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील पालघरजवळ झालेल्या वाहन दुर्घटनेत निधन झाले. संभाजी पाटलाच्या वाहनाने एका ट्रकला जोराची धडक दिली. सदर अपघात सकाळी १० वाजता झाला.

सदर वाहन संभाजीचा मित्र चालवित होता. गुजरातकडे नेमबाजीचा सराव करण्यासाठी संभाजी आणि त्याचा मित्र मुंबईहून अहमदाबाकडे जात असताना ही दुर्घटना घडली. संभाजी पाटीलच्या सुसाट वेगाने धावणाऱ्या मोटारीने ओव्हर टेक प्रयत्न करत असताना ही दुर्घटना घडली. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा अपघात घडल्याचे सांगण्यात आले. २०१६ च्या कनिष्ठांच्या विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत संभाजी पाटीलने सुवर्णपदक मिळविले होते. संभाजी पाटीलला जसपाल राणाचे मार्गदर्शन लाभले होते. पुण्याजवळील बालेवाडी क्रीडा संकुलात संभाजी पाटील क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत होता.

# न्यूझीलंडचा यूएईवर अवघ्या ९२ चेंडूतच विजय

**चेन्नई/वृत्तसंस्था :** टिम सेफर्ट आणि फिन ॲलन या सलामीवीरांच्या विश्वविक्रमी भागीदारीच्या जोरावर न्यूझीलंडच्या संघाने यूएईवर १० विकेट्स राखून दणदणीत विजय नोंदवला आहे. प्रथम फलंदाजी करताना युएईने २० षटकात ६ बाद १७३ धावा करत किवी संघासमोर १७४ धावांचे टार्गेट सेट केले होते. चेपॉकच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या सलामी जोडीने ९२ चेंडूत मॅच संपवली. वर्ल्डकपमधील किवीज संघाचा हा सलग दुसरा विजय ठरला.




यूएईने दिलेल्या १७४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडने एकही विकेट न गमावता सहज सामना आपल्या नावे केला. टीम सेफर्टने २३ चेंडूत अर्धशतक तर फिन ॲलनने २६ चेंडूत अर्धशतक झळकावले. या दोघांनी ९२ चेंडूत १७५ धावांची विक्रमी भागीदारी रचताना संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. सेफर्टने ४२ चेंडूत १२ चौकार व ३ षटकारांसह नाबाद ८९ धावा केल्या. तर फिन ॲलनने ५० चेंडूत ५ चौकार व ५ षटकारांसह ८४ धावांची खेळी करत संघाला १५.२ षटकांत विजय मिळवून दिला.

प्रारंभी, युएईने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीवीर आर्यांश शर्मा ८ धावांवर झेलबाद झाला. यानंतर कर्णधार मुहम्मद वसीमने ४५ चेंडूत ४ चौकार व ३ षटकारांसह ६६ धावांची खेळी केली. तर अलिशान शराफूने ४७ चेंडूत ५ चौकार व २ षटकारांसह ५५ धावांचे योगदान दिले. तर मधल्या फळीत मयंक कुमारने २१ धावा फटकावल्या. या जोरावर यूएईने २० षटकांत ६ गडी गमावत १७३ धावा केल्या.

**संक्षिप्त धावफलक :** सौदी अरेबिया २० षटकांत ६ बाद १७३ (मुहम्मद वसीम ६६, शराफू ५५, मयांक कुमार २१, मॅट हेन्री २ बळी, जेकब डफफी, फर्ग्युसन, सँटनर आणि ग्लेन फिलिप्स प्रत्येकी १ बळी) न्यूझीलंड १५.२ षटकांत २ बाद १७५ (टीम सेफर्ट ४२ चेंडूत १२ चौकार आणि ३ षटकारासह नाबाद ८९, फिन ॲलन ५० चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारासह नाबाद ८४). न्यूझीलंडने युएईला पराभूत करत टी-२० विश्वचषकातील पहिला ऐतिहासिक विजय मिळवला. आजवर न्यूझीलंडने १० विकेट्स राखून कधीच विजयाची नोंद केली नव्हती. हा ऐतिहासिक विजय मिळवण्यासाठी फिन ॲलन व टीम सेफर्ट यांनी विक्रमी भागीदारी रचली. विशेष म्हणजे, या दोघांत ९२ चेंडूत १७५ धावांची भागीदारी झाली. टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासात कोणत्याही विकेटसाठी झालेली ही सर्वोच्च भागीदारी ठरली.

# पाकची अमेरिकेवर ३२ धावांनी मात; सामनावीर साहिबजादा फरहान ७३ धावा

**कोलंबो/वृत्तसंस्था :** आयसीसी टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत पाकिस्तानने सलग दुसरा विजय मिळवत सुपर ८ फेरीसाठी दावा मजबूत केला आहे. मंगळवारी झालेल्या सामन्यात अमेरिकेसमोर १९१ रन्सचं टार्गेट ठेवले होते. यूएसएने विजयी धावांचा पाठलाग करताना आश्वासक सुरुवात केली होती. त्यामुळे यूएसए २०२४ नंतर पुन्हा एकदा पाकिस्तानला लोळवून उलटफेर करेल असे वाटत होते. मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजांसमोर यूएसएला ८ विकेट्स गमावून १५८ धावांपर्यंतच पोहोचता आले. या विजयासह पाकने २०२४ च्या पराभवाची परतफेड केली तर यूएसएचा हा सलग दुसरा पराभव तर पाकचा दुसरा विजय आहे.



पाकने दिलेल्या १९१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेची सुरूवात चांगली झाली. पण मधल्या षटकांमध्ये पाकिस्तानच्या फिरकीपटूंनी सामन्यावर पकड घट्ट केली. शायन जहांगीरने ३४ चेंडूत ५ चौकार व २ षटकारांसह ४९ धावा केल्या. तर ॲंड्रिज गौस १३ धावांवर बाद झाला. यानंतर मिलिंद कुमारने चांगली फलंदाजी केली, पण तो २९ धावांवर माघारी परतला. यानंतर शुभम रांजणेने ३० चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ५१ धावांची खेळी केली. तर बाकीचे इतर फलंदाज फेल ठरले. पाकच्या उस्मान तारिकने २७ धावांत ३, शादाब खानने २६ धावांत २ बळी मिळिवले.

प्रारंभी, पाकने प्रथम फलंदाजी करताना सावध सुरूवात केली. पण सईम अयुब १९ धावा करत झेलबाद झाला. यानंतर साहिबजादा फरहानने ४१ चेंडूत ६ चौकार व ५ षटकारांसह ७३ धावांची शानदार खेळी केली. तर बाबर आझमने ३२ चेंडूत ४ चौकार व एका षटकारासह ४६ धावांचे योगदान दिले. शादाब खानने १२ चेंडूत ४ चौकार व एका षटकारासह ३० धावांची खेळी केली. या जोरावर पाकिस्तानने ९ बाद १९० धावा केल्या. अमेरिकेच्या शॅडली व्हान शाल्कवीकने २५ धावांत ४ बळी मिळिवले. मोहम्मद मोहसिन व हरमीत सिंग यांनी एकेक बळी मिळिवले. संक्षिप्त धावफलक : पाक २० षटकांत ९ बाद १९०, अमेरिका २० षटकांत ८ बाद १५८.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मरणाच्या दारात असताना इंजेक्शन दिलं, खरे फुटेज दाखवलेच नाहीत'



## बिग बॉसवर दिव्या शिंदेचा घणाघात..




**मुंबई :** सध्या दिव्या शिंदे बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वामुळे चर्चेत आहे. गेल्या आठवड्यात दिव्याला बिग बॉसच्या घरातून निष्कासित करण्यात आलं. घरातील सदस्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याम ुळे आणि त्यानंतर माफी मागण्यास नकार दिल्यामुळे दिव्याला बिग बॉसच्या घराबाहेर काढण्यात आलं. दिव्या घराबाहेर येताच तिच्या चाहत्यांना धक्का बसला. अशातच आता नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिव्याने बिग बॉसबद्दल अनेक खुलासे केले आहेत. बिग बॉसच्या घरात दिव्याच्या तब्येतीची काळजी घेण्यात आली नाही, असं तिनं सांगितलंय.बिग बॉससाठी सिलेक्शन कसं होतं? असं विचारलं असता त्यावर बोलताना दिव्या शिंदे म्हणाली की, 'त्यांची टीम माझ्याकडे आलेली. तीन मिटिंग झालेल्या. मी काही अटी ठेवलेल्या. त्यांनी त्या मान्यसुद्धा केल्या. मी माझ्या आजारपणाबद्दलही त्यांना सांगितलेलं. मला आराम करायला वेळ मिळाला नव्हता. मी त्यांना सांगितलेलं, मी फिजिकली फिट नाहीये. त्यावर त्यांनी मला सांगितलं, 'नाही नाही ताई...आम्ही काळजी घेऊ''पण, माझी काही काळजी घेतली नाही. जेव्हा मी मरणाच्या दारात होते तेव्हा दोन दिवसांनी मला इंजेक्शन दिलं. हल्ली माझा ऑक्सिजन कमी होत होता. दोन दिवसानंतर मला इंजेक्शन देण्यात आलं. तेव्हा मी रडत होते जोर-जोरात. माझी काही काळजीच त्यांनी घेतलेली नाहीये.' असं दिव्याने पुढे सांगितलं. बिग बॉसने काही फुटेज दाखवले नाहीत, असं दिव्याने सांगितलं. याबद्दल बोलताना आणि घडलेला प्रकार सांगताना दिव्या म्हणाली की, 'ज्यावेळेस मी कन्फ ेशन रूममध्ये होते, त्यावेळी मी म्हणालेली मला शो सोडायचाय. मी हा शो पुढे करू शकत नाही. माझ्या म ान-सन्मानावर गोष्टी यायला लागल्या आहेत. हे कायम मला झेझश करतायत. त्यामुळे मी बाहेर जाण्यासाठी इच्छुक आहे. आणि मला कळून गेलेलं, या गोष्टी आपल्यासाठी नाहीयेत. तेव्हा मी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. हे त्यांनी दाखवलं नाहीये. त्याचबरोबर बाकीचे स्पर्धक माझ्याकडे आले, ही धमकी आहे धमकी आहे म्हणत, त्यामध्ये जे संभाषण आहे, तिथेही मी माझा मुद्दा मांडलेला. पण, त्यांनी ते दाखवलं नाही.'प्राजक्ता शुक्रेनं मला सांगितलं की तू म्हण 'शब्दांची तलवार' त्यावर मी तिला म्हटलं, 'अगं, तू मला हे सांगायची गरज नव्हती, कारण माझ्या डोक्यातच हे होतं. मी तेच बोलणार होते, पण थांबून बोलणार होते. हेही त्यांनी दाखवलं नाही. राकेश बापट, प्राजक्ता शुक्रे, ओमकार राऊत, करण सोनावणे यांच्यासोबत माझं बोलणं झालेलं, कन्फेशन रूममध्ये जाण्याअगोदर, पण त्यांनी ते फुटेजसुद्धा दाखवलं नाही. मी राकेश बापटला माझा मुद्दा स्पष्ट केला, त्यांनी बिग बॉसला समजावण्याचा प्रयत्न केला.' असं दिव्याने पुढे सांगितलं.

# रील स्टार प्रथमेश कदमचा मृत्यू नेमका कशाने झाला? आईने रडत रडत सांगितले खरे कारण

**मुंबई :** सोशल मीडियावर प्रसिद्ध मराठी रीलस्टार आणि कंटेंट क्रिएटर प्रथमेश कदम याचे २६ जानेवारी २०२६ला निधन झाले. त्याच्या अशा अचानक जाण्याने त्याच्या चाहत्यांना आणि कुटुंबाला मोठा धक्का बसला. त्यांच्या मृत्यूची अनेक कारणे समोर आली. कोणी म्हटलं आत्महत्या केली. तर कोणी डेंग्यू असल्याचे सांगितले. अनेक अफवाही पसरल्या. मात्र आता प्रथमेश कदमच्या निधनाचे खरे कारण समोर आले आहे. प्रथमेशच्या आईने रिल स्टार प्रज्ञा कदम यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट करून यासंबंधित माहिती दिली आहे.

प्रथमेशच्या आईने सांगितल्यानुसार, प्रथमेशच्या रक्तात कावीळ मिसळली होती. ती म्हणजे सफेद कावीळ होती. डॉक्टरांना सुरूवातीला प्रथमेशला सफेद कावीळ झाल्याचे समजले नाही. शेवटच्या क्षणी डॉक्टरांना कळले. जेव्हा डॉक्टरांनी रिपोर्ट केले तेव्हा नॉर्मल आले. डॉक्टरांनी प्रथमेशच्या आईला खात्री दिली होती की, दोन-तीन दिवसात प्रथमेश बरा होईल, म्हणून त्याला ॲडमिट केले होते. मात्र अखेर काविळमुळे प्रथमेशचे निधन झाले. संपूर्ण शरीरात, रक्तात कावीळ पसरली होती. व्हिडीओच्या शेवटी प्रथमेशच्या आईने हात जोडून चाहत्यांना खोट्या अफवा पसरवू नका, अशी विनंती केली आहे. प्रथमेशच्या आईने त्यांना थोडा वेळा द्यावा, अशी देखील विनंती केली आहे. या व्हिडीओच्या कॅप्शनला लिहिलं की, 'कृपया अफवा पसरवणे थांबव... कमेंट्स, कॉल्स थांबवा मित्रांनो... लवकरच परत भेटूया...' प्रथमेश कदमच्या अशा अचानक जाण्याने कलाकारांनाही मोठा धक्का बसला होता. प्रथमेश कदम आणि त्याच्या आईचा सोशल मीडियावर मोठा चाहता वर्ग आहे. ते अनेक विषयांवर सुंदर रील बनवायचे. प्रथमेशच्या रीलमध्ये आई आणि बहिणी कायम दिसायचे. माय-लेकाची जोडी इंटरनेटवर खूप प्रसिद्ध होती. त्यांचे इन्स्टाग्रामवर १९६घ फॉलोअर्स आहेत. प्रथमेश आणि त्याची आई कॉमेडी आणि भावनिक व्हिडीओ बनवायचे. प्रथमेश आपल्या करिअरमध्ये खूपच उत्तम होता. चाहत्यांसाठी रोज नवीन काही तरी करायचा आणि त्यांना हसवायचा. प्रथमेशच्या आईच्या या व्हिडीओने सर्व चर्चांना अखेर पूर्ण विराम मिळाला आहे.

# तळपदे विरोधात फसवणुकीची तक्रार



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता श्रेयस तळपदे आणि इतर १२ सदस्यांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रेयस तळपदे यांनी गुंतवणुकीच्या नावाखाली एका व्यक्तीची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

१० फेब्रुवारी रोजी श्रेयस तळपदे यांच्यासह इतरांविरोधात मैनपुरीच्या भोगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. भोगाव येथील तक्रारदाराचा आरोप आहे की, अभिनेत्याने आणि त्याच्या साथीदारांनी गुंतवणुकीचे आमिष दाखवून त्यांची लाखो रुपयांची फसवणूक केली आहे.

तक्रारीनुसार, अभिनेत्याने भोगावच्या मिश्रणा मोहल्लयात मुंबईची एक बँक शाखा उघडण्यासाठी आणि त्यात गुंतवणूक करण्यासाठी अनेक गावकऱ्यांकडून पैसे घेतले, मात्र, नंतर समोर आले की ज्या बँकेचा उल्लेख करण्यात आला होता ती बनावट आहे.

तक्रार मिळाल्यानंतर न्यायालयाने प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. तक्रारीत श्रेयस तळपदे यांच्याव्यतिरिक्त समीर अग्रवाल, सानिया अग्रवाल, आरके शेट्टी, संजय मुदगिल, शबाब हुसेन, नरेंद्र नेगी, पंकज अग्रवाल, सुप्रिया, अनुज जैन, अजय श्रीवास्तव आणि अरविंद त्रिपाठी यांची नावेही समाविष्ट आहेत. तक्रारीत श्रेयस तळपदे यांना मार्केटिंग सल्लागार म्हणून नमूद केले आहे.

# स्किटच करायचं होतं तर हास्यजत्रेत का गेला नाही?गौरव मोरे म्हणतो..

**मुंबई :** मराठी अभिनेता गौरव मोरेला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमानं लोकप्रियता मिळाली. आजही त्याला हास्यजत्रा फेम अभिनेता म्हणून ओळखलं जातं. मात्र, गौरवने अचानक हास्यजत्रा सोडली म्हणून त्याच्या चाहत्यांना धक्का बसला. गौरवने हास्यजत्रा सोडली याबद्दल अनेक चर्चाही झाल्या. त्याची कारणंही वेगवेगळी सांगितली गेली. मात्र, स्वतः गौरवने हास्यजत्रा सोडण्याचं कारण सांगितलं. 'सारखा तोच तोचपणा होत होता' म्हणून हास्यजत्रा सोडल्याचं गौरवने सांगितलं. हास्यजत्रा सोडल्यानंतर गौरव मोरेनं हिंदी शो केला. त्यानंतर तो 'चला हवा येऊ द्या'च्या दुसऱ्या पर्वात झळकला. गौरवने 'चला हवा येऊ द्या'मध्ये एन्ट्री करताच अशा चर्चा झाल्या की, जर स्किट करायचं होतं, तर पुन्हा हास्यजत्रेमध्ये का नाही गेला? यावर आता गौरवने मौन सोडलं आहे.

'९ माईड्स क्रीशन 'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये गौरवला 'चला हवा येऊ द्या'बद्दल विचारण्यात आलं. त्यावर गौरव मोरे म्हणाला की, 'मधे गॅप आहे ना. मी २०२४च्या एप्रिलमध्ये हिंदी शो करायला घेतला, तिथून मधे गॅप होता आणि त्यानंतर २०२५ मध्ये 'चला हवा येऊ द्या' करायला घेतलं. ३६५ दिवस गेले ना.'पुढे, 'स्किट करायचं होतं तर हास्यजत्रेमध्ये का नाही गेला?' असं विचारलं असता गौरव मोरे म्हणाला की, 'कलाकार वेगळे आहेत, त्यांचा अनुभव वेगळा आहे. त्यांची पद्धत वेगळी आहे. माझ्यासाठी सगळंच नवीन. जरी मी तिथे होतो, तरी मी इथे आल्यावर शून्य होतो. मला किती येतंय, प्रत्येकाची शैली कशीये, कोण कसं काम करतं, हे शिकायचं होतं'याच मुलाखतीदरम्यान, ओंकार भोजनेबद्दल बोलताना गौरव म्हणाला की, 'ओंकार भोजनेसारखा नट नाही आणि पुढच्या १० वर्षात होणार नाही.

त्याच्याकडे जादू आहे एक. अत्यंत हुशार आणि सगळ्यांचा आदर करणारा माणूस, त्याचबरोबर फार कोणाम ध्ये नसणारा माणूस.' समीर चौघुले यांच्याबद्दल बोलताना गौरव म्हणाला की, 'चींश्रींळींरश्रशपींशव कामावर एवढं प्रेम असणारा व्यक्ती मी कधीही पाहिली नाही'



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटींची तात्काळ पूर्तता करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ङ्कभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाफ्फ अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जातील त्रुटींची तात्काळ पूर्तता करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा कार्यालयाने केले आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या, तसेच रीतसर अर्ज करूनही प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी आणि १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विविध स्तरांवरील महाविद्यालये/शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी आवश्यक आर्थिक मदत देण्यासाठी ही योजना शासन निर्णय दि. ०६ जानेवारी २०१७ अन्वये सुरू करण्यात आली आहे. योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा आणि कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने योजनेचा विस्तार तालुकास्तरावर दि. २६ डिसेंबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आला आहे. सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांनी HTTP://HMAS.MAHAIT.ORG□M संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर केले असून अर्जांची कार्यालयीन तपासणी सुरू आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः चा आयडी व पासवर्ड वापरून अर्जाची सद्यस्थिती वेळोवेळी तपासावी. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज करण्यात आले आहेत त्यांनी अर्जातील नमूद त्रुटी विहित वेळेत दुरुस्त करून अर्ज पुन्हा ऑनलाईन पद्धतीने फॉरवर्ड करावा. अर्ज फॉरवर्ड करण्यापूर्वी बँक तपशील खाते क्रमांक, कोड, खातेधारकाचे नाव इत्यादी माहिती अचूक नोंदविण्याचे विशेष निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून लाभाची रक्कम आधार-संलग्न बँक खात्यात थेट व वेळेत जमा होईल. तसेच शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये ऑनलाईन अर्ज केलेल्या, परंतु अर्जाची हार्डकॉपी व आवश्यक कागदपत्रे अद्याप कार्यालयात जमा न केलेल्या विद्यार्थ्यांनी दि. १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित कागदपत्रे जमा करावीत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा मनोज मेरत यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद विभागीय क्रीडा स्पर्धांचा बुलढाण्यात शुभारंभ

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हा परिषदेच्या पुढाकाराने आयोजित तीन दिवसीय विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा आज स्थानिक जिल्हा क्रीडा संकुल येथे उत्साहात शुभारंभ झाला. अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या पाच जिल्हा परिषदांचे अधिकारी व कर्मचारी या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्पर्धकांना संबोधित करताना सांगितले की, हा उपक्रम वैयक्तिक क्रीडा कौशल्य विकासाबरोबरच परस्पर समन्वय, सांघिक वृत्ती आणि सहकार्य भावना दृढ करणारा आहे. ङ्कड्ड्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांनी लोकसेवा अधिक सक्षम करण्यासाठी परस्पर सहकार्य वाढवावे,फ्फ असे आवाहन त्यांनी केले. बुलढाण्याला मिळालेली ही आयोजनाची संधी अमरावती विभागासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. समारंभाचे अध्यक्षस्थान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी भूषविले. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी शिस्त व सभ्यता या मूल्यांच्या आधारे अमरावती विभाग राज्यात नावलौकिक मिळवेल, असा आशावाद व्यक्त केला. विभागीय आयुक्त कार्यालयातील विकास शाखेचे अपर आयुक्त राजीव फडके यांनी विभागीय आयुक्तांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविला. दीपप्रज्वलन, क्रीडा ध्वजारोहण आणि क्रीडा ज्योत प्रज्वलन करून स्पर्धांचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला. खेळाडूंना शपथ देण्यात आली. केम्ब्रिज स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या बँड पथकाने सादर केलेल्या संगीतमय वातावरणात आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोराखेडी येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आदिवासी नृत्याने उपस्थितांची दाद मिळविली. विविध विभागांचे अधिकारी, खातेप्रमुख तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे व किरण वाघमारे यांनी केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले यांनी आभार मानले.

# महाडीबीटीवरील शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालय स्तरावर दिरंगाई ३,०५४ अर्ज प्रलंबित




**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात महाडीबीटी प्रणालीवर विविध शिष्यवृत्ती व सहाय्य योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर शिक्षण परीक्षा फी प्रदाने, राजश्री छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यवसाय पाठ्यक्रमाशी संलग्न वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन तसेच व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना यांचा समावेश आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्ष () व नूतनीकरण () अर्ज नोंदणीसाठी महाडीबीटी पोर्टल दिनांक ३० जून २०२६ पासून माहिती तंत्रज्ञान विभागाकडून सुरू करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय स्तरावर तपासून पुढील कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. महाडीबीटी पोर्टलवरील डॅशबोर्डच्या सद्यस्थितीनुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण १०,९१७ अर्ज आजमितीस भरले गेले असून त्यापैकी ३,०५४ अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. विभागाकडून वारंवार सूचना देऊनही काही महाविद्यालयांकडून अर्ज तपासणी व सादरीकरणास दिरंगाई होत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत सामाजिक न्याय विभागाने संबंधित महाविद्यालयांना तातडीने प्रलंबित अर्जांची तपासणी पूर्ण करून पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पुढे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने अर्ज प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी महाविद्यालयांनी आवश्यक ती तत्परता दाखवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जादूटोणा विरोधी कायद्याबाबत जनजागृतीसाठी प्रचार-प्रसार मोहीम राबविणार

**जनसंचलन/बुलढाणा**




महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाने दि. २० डिसेंबर २०१३ रोजी अधिनियम २०१३ लागू केला आहे. भारतीय समाजात रुजलेल्या काही अनिष्ठ व अमानुष प्रथांमुळे समाजाचे मानसिक, सामाजिक व आर्थिक नुकसान होत असल्याचे लक्षात घेऊन हा कायदा जारी करण्यात आला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अश्रनि-२०२२/प्र.क्र.१४५/सामासु, मंत्रालय मुंबई, दि. २८ जून २०२२ अन्वये जिल्हास्तरीय समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत जादूटोणा विरोधी कायद्याबाबत व्यापक जनजागृती, प्रचार व प्रसार कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच नागरिकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध वृत्तपत्रांमधून बातम्या प्रसिद्ध करण्याबाबतही सूचनाही करण्यात आल्या. प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, जादूटोणा, नरबळी व इतर अमानुष प्रथांविरोधात जागरूक राहून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सहकार्य करावे. समाजाचे मानसिक स्वास्थ्य जपणे व शोषण-छळ रोखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# बुलढाणा नगरपालिका हद्द वाढीला सागवन ग्रामस्थांचा तीव्र विरोध!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरालगत असलेल्या सागवन गावात संभाव्य बुलढाणा नगरपालिका हद्द वाढीच्या निर्णयाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी सागवन ग्रामस्थांची निष्पक्ष, निर्भीड बैठक पार पडली. या बैठकीत खालील विषय मांडून त्यावर चर्चा करण्यात आली. मौजे सागवन ग्रामपंचायत क्षेत्रात आणि जांभरुण गावाचा समावेश आहे असे आम्हाला समाज माध्यमे वृत्तपत्रे तसेच मा. उच्च न्यायालय नागपूर रिट याचिका क्रमांक ४७८९/२०२५ मधील दि. १९/०१/२०२६ चे निर्णयावरून समजले की, मा.जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी हद्द वाढ संदर्भात प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे व त्यात मौजे सागवान जांभरूण चा सुद्धा समावेश आहे. जिल्हाधिकारी यांनी हद्दवाढ प्रस्तावांमध्ये आमचे ग्रामपंचायत सागवन जांभरून चा समावेश केला आहे तो पूर्णतः कायदा व नियमांचे उल्लंघन करणारा आहे. बुलढाणा नगर परिषदेचे हद्दवाढ करावी आणि त्यामध्ये आमचे गावाचा समावेश करावा अशी आमची जनतेची कोणती मागणी नव्हती व नाही. ग्रामपंचायत सागवन सर्वसाधारण सभा दिनांक २८/०७/२०२१ ठराव क्रमांक आठ अन्वये सागवन ग्रामपंचायत ला बुलढाणा नगरपरिषद हद्दवाढी मध्ये सामील करण्यात येऊ नये. गाव आणि जनतेच्या हितासाठी ग्रामपंचायत सागवनचे अस्तित्व स्वतंत्र ठेवावे असा ठराव घेतलेला आहे. तसेच मौजे सागवन ग्रामपंचायत येथील ग्रामसभा दिनांक २/१०/२०२१ रोजीचे ग्रामसभेमध्ये सुद्धा ग्रामपंचायतचे अस्तित्व स्वतंत्र ठेवण्यात यावे. ग्रामपंचायतला नगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात येऊ नये असा ठराव क्रमांक चार पारित केलेला आहे. नगरपरिषद बुलढाणा यांनी २९/१२/२०२० रोजी घेतलेल्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक ३४ हा नियमबाह्य असून कायद्याचे उल्लंघन करणारा आहे. नगरपरिषदला अशा प्रकारची स्वतःचे हद्दवाढ करून घेण्याचा कोणता अधिकार नाही. ग्रामपंचायत सागवनच्या जनतेने नगरपालिकेकडे कोणत्याही नागरिक सुविधांची मागणी केली नाही. ग्रामपंचायत सागवन ही गावातील जनतेस नागरी सुविधा देण्यास सक्षम आहे असे असताना, जिल्हाधिकारी आणि नगरपरिषदेने अगदी हुकूमशाही पद्धतीने नियमांची उल्लंघन करून सदरचा हद्दवाढ प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे तो आम्हाला मान्य नाही सदरच्या प्रस्तावातून सागवन ग्रामपंचायत क्षेत्र वगळण्यात यावे. सागवन जांभरूण सोबतच सुंदरखेड, येळगाव, माळविहीर या गावांचा समावेश बुलढाणा नगरपालिकेमध्ये करावा असा प्रस्ताव बुलढाणा नगरपालिकेच्या वतीने शासन स्तरावर पाठविला आहे. सदर हद्द वाढ प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे आणि आता तो अंतिम टप्प्यात येताना दिसत आहे परंतु या सर्व प्रक्रियेमध्ये ग्रामस्थांची भावना ग्रामस्थांची भूमिका कधीही जाणून घेण्यात आली नाही. आणि तशी कुठलीही इच्छा सागवन ग्रामस्थांची बुलढाणा नगरपालिकेमध्ये जाण्याची नाही. त्यामुळे जर असं काही होत असेल तर ते खूप अन्यायकारक होईल. येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या आपले स्वतंत्र गाव म्हणून असलेली सांस्कृतिक, सामाजिक,



आर्थिक, प्रशासनिक ओळख पुसण्यासाठी कारणीभूत ठरेल सर्वसामान्य जनतेला नाहक शहरी अतिरिक्त करांचा बोजा सहन करावा लागेल. सागवन गावाच्या वाट्याला सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रशासनिक गुलामगिरी आणण्याचा जो घाट घातला जातोय त्याचा तीव्र निषेध सर्व गावकऱ्यांनी व्यक्त केला. आमचं सार्वभौमत्व, आमचे स्वातंत्र्य, आमची सागवन गाव म्हणून असलेली ओळख पूर्वीपासून स्वतंत्र आहे आणि ती स्वतंत्रच राहीली पाहिजे यावर सर्व गावकऱ्यांनी भर दिला. तसेच सागवन गावाची पूर्वापार असलेली कायम ठेवून नगरपालिकेमध्ये समाविष्ट करू नये अशी विनंती प्रशासनाला करण्यात येणार आहे यासंबंधी विविध स्तरावर गावकऱ्यांच्या वतीने प्रयत्न करण्यात येतील असं ठरविण्यात आले. तसेच याबाबतीत सागवन बचाव कृती समिती स्थापन करून गावाला नगरपालिकेत जाण्यापासून वाचवण्यासाठी संघर्ष करण्याचे एकमताने ठरले. नगरपालिकेमध्ये जायचं की नाही जायचं हा सर्वस्वी गावाचा अधिकार असताना ग्रामसभेला कुठल्याही प्रकारे विश्वसात न घेता परस्पर नगरपालिकेने हा ठराव का पाठविला याचा सुद्धा जाब ग्रामस्थ आता विचारत आहेत. भविष्यात असा जर कुठला तुगलकी निर्णय शासनाने जाहीर केला तर त्यावेळी त्या विरोधात प्रचंड असंतोष उपळल्याशिवाय राहणार नाही अशा इशारा सुद्धा ग्रामस्थांनी दिला. गावाच्या सार्वभौमत्वाच्या स्वाभिमानाच्या अस्मितेसाठी आमचा लढा शेवटच्या श्वासापर्यंत त्या ठिकाणी कायम राहील असा निर्धारही या ठिकाणी गावकऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी गावातील नागरिक, महिला बंधू-भगिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत सागवन गावाच्या अस्मितेच्या प्रश्नावर विचार मंथन करण्यासाठी आयोजित केलेल्या या बैठकीमध्ये आपापले मत व्यक्त केले.

# वीर परिवार सहायता योजना अंतर्गत प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबीर संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील प्रशिक्षण केंद्रात आज सकाळी ११.०० वाजता वीर परिवार सहायता योजना अंतर्गत अधिकार मित्र यांचे प्रशिक्षण तसेच माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांसाठी मार्गदर्शन शिबीर उत्साहात पार पडले. सदर कार्यक्रम एन. एन. पाटील, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा आणि स्कवॉडर्न लीडर रुपाली सरोदे, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थितांना वीर परिवार सहायता योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रसंगी मा. एन. एन. पाटील, स्कवॉडर्न लीडर रुपाली सरोदे, ॲड. राहुल दाभाडे आणि ॲड. संजय इंगळे यांनी उपस्थितांना विविध कायदेशीर बाबींविषयी मार्गदर्शन केले. शिबिरात माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांच्या हक्क, योजना लाभ प्रक्रिया आणि कायदेशीर सहाय्य याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली. कार्यक्रमास माजी सैनिक, त्यांच्या



कुटुंबियांसह संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामुळे लाभार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

# सागर बोर्डे यांना एशियन आंतरराष्ट्रीय लॅक्रोस स्पर्धेत भारतीय संघास सुवर्णपदक

**जनसंचलन/बुलढाणा**

आंतरराष्ट्रीय ऑलम्पीक संघटना मान्यता प्राप्त असलेला लेक्रॉस खेळ हा सन २०२८ चे ऑलम्पीक खेळामध्ये सामाविष्ट असलेल्या खेळ असुन सौदी अरब येथे एशियन आंतरराष्ट्रीय लॅक्रोस अजिंक्यपद स्पर्धा दिनांक २-५ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्याचे खेळाडू श्री.सागर नंदकिशोर बोर्डे, यांनी राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून भारतीय लॅक्रोस संघात निवड होऊन त्यांनी खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत सौदी अरब, पाकिस्तान, इराक लॅक्रोस संघाला पराभव करून भारतीय संघाला




सुवर्णपदक मिळून दिले. बुलढाणा जिल्हा लॅक्रोस खेळाचे मार्गदर्शक आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रीराम निळे यांनी खेळाडूंना मोलाच्या मार्गदर्शन केले

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८